सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचाररुग्णालय, पुणे.

जयप्रकाश नारायण रोड, पुणेरेल्वेस्टेशनजवळ, पुणे४११००१

# नागरिकांची सनद

# प्रस्तावना

प्रशासन लोकाभिमुख होण्यासाठी तसेच शासनाच्या दैनंदिन कामकाजात पारदर्शकता आणून शासनाने धोरण राबविण्यासाठी नागरीकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार करण्यांत आली आहे. जनतेला त्यांच्या कामाबाबत होणारे गैरसोय टाळण्यासाठी या सनदेची निर्मिती करण्यांत आलेली असून जनतेचे काम विहित मुदतीच्या आत करुन घेण्याचा हक्क ख-या अर्थाने याद्वारे प्राप्त होणार आहे. या सनदेद्वारे जनतेला चांगली सेवा देणे तसेच कायद्याची आणि नियमांची अंमलबजावणी संबंधीत अधिकाराद्वारे करुन पारदर्शक प्रशासनाची खात्री जनतेला देता येईल अशा महत्वाच्या बाबींचा समावेश यात आहे.

शासनाकडून जनतेला विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. यासेवा कमीतकमी वेळात मिळाव्यात व त्या दर्जेदार असाव्यात अशी जनतेची माफक अपेक्षा असते. या सेवांची पुरेपूर माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच शासकीय कामकाजात सुधारणा करणे, पारदर्शकता आणुन जनतेच्या बाबतीत आपले उत्तरदायित्व जोपासणे या उद्दिष्टांच्या पुर्तीकरिता नागरीकांची सनद (सिटीझन चार्टर) तयार करण्यांत आली आहे.

महाराष्ट्र शासनाने १९७१ साली पासून सर्जन जनरल या कार्यालयाचे विभाजन करुन संचालक आरोग्य सेवा व संचालक वैद्यकीय शिक्षण व संशाधन अशी दोन वेगवेगळी संचालनालये स्थापन केली.या स्थापनेचा १ सप्टेंबर हा वैद्यकीय शिक्षण दिवस म्हणून आयोजित करण्यात येतो. महाराष्ट्र राज्यामध्ये वैद्यकीय, दंत, परिचारीका व इतर आरोग्य सेवेशी संबंधित अभ्यासक्रमाचे बळकटीकरण करणे व त्यात वाढ करणे या उद्देशाने हे संचालनालय महाराष्ट्र शासनाने स्थापन केले आहे.

बै.जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय हे संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत आहे. ससून सर्वोपचार रुग्णालय हे पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख सरकारी रुग्णालय आहे. येथे संपूर्ण महाराष्ट्रातून विविध उपचारांसाठी रुग्ण येत असतात.

# नागरिकांची सनद

## १ नागरिकांना उत्तम दर्जाची सेवा देण्यासाठी नागरिकांची सनद तयार करण्यात आली आहे.

नागरिकांची सनद

अ) ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये ॲलोपॅथीक व आयुर्वेदिक उपचार पध्दतीनुसार आधुनिक वैद्यकशास्त्राद्वारे रुग्णांवर उपचार करण्यात येतात.

ब) सदरहू आधुनिक उपचार पध्दती नागरिकांमध्ये लोकप्रिय करुन अधिकाधिक रुग्णांना व्याधीमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

क) ॲलोपॅथीक / आयुर्वेदिक / दंत पध्दतीमध्ये  संशोधन करुन त्याचप्रमाणे जगातील इतर नवनविन संशोधनात्मक बाबींचा वापर करुन नागरिकांना या संशोधनाचा लाभ मिळवून देण्यासाठी रुग्णालय कटिबध्द् आहे.

## ससुन सर्वोपचार रुग्णालय,पुणे यांच्या कार्यप्रणाली बाबतची सविस्तर माहिती

(अ) विभागाची सर्वसाधारण माहिती व विभागांतर्गतच्या क्षेत्रिय कार्यालयातील मंजूर कार्यरत अधिकारी व कर्मचारी याबाबतची संवर्गनिहाय संख्यात्मक माहिती :
या महाविद्यालयातर्फे खालीलप्रमाणे यंत्रणा व कार्यप्रणाली राबविण्यात येते.



# रुग्णालयातील कार्यासने

## ससुन सर्वोपचार रुग्णालय ,पुणे.

## कार्यासने

| | |
|---|---|
| अे : वर्ग १ व वर्ग २ अधिकारी आस्थापना विभा | एच : निवृत्ती वेतन देयक /भविष्य निर्वाह निधी विभाग |
| बी : तृतीय श्रेणी कर्मचारी आस्थापना विभाग | आयः वेतन देयके विभाग |
| सी : चतुर्थ श्रेणी कर्मचारी आस्थापना | जेः इमारत व दळणवळण |
| डी : वैद्यकीय बील / प्रवास भत्ता विभाग | के : रोखपाल विभाग |
| इ : माहिती अधिकार , सुरक्षा रक्षक, लेखा परिक्षण विभाग | एल : न्यायालयीन प्रकरणे विभाग, |
| एफ : अंदाजपत्रक (बजेट) विभाग | एम : आवक व जावक विभाग |
| जी : आकस्मिक देयक विभाग | एन : अधिसेविका अस्थापना |

**ससुन सर्वोपचार रुग्णालयामध्ये असलेल्या कार्यासनाचे ई-मेल आय डी खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | कार्यासनाचे नांव | ई-मेल आय डी |
|---|---|---|
| १. | अधिष्ठाता कक्ष | deanbjmcpune@gmail.com |
| २. | कार्यासन "अे"- | sghpune@gmail.com |
| ३. | कार्यासन "बी"- | sghpune@gmail.com |
| ४. | कार्यासन "सी"- | sghpune@gmail.com |
| ५. | कार्यासन "डी"- | sghpune@gmail.com |
| ६. | कार्यासन "इ"- | sghpune@gmail.com |
| ७. | कार्यासन "एफ"- | sghpune@gmail.com |
| ८. | कार्यासन "जी"- | sghpune@gmail.com |
| ९. | कार्यासन "एच"- | sghpune@gmail.com |
| १०. | कार्यासन "आय"- | sghpune@gmail.com |
| ११. | कार्यासन "जे"- | sghpune@gmail.com |
| १२. | कार्यासन "के"- | sghpune@gmail.com |
| १३. | कार्यासन "एल"- | sghpune@gmail.com |
| १४. | कार्यासन "एम"- | sghpune@gmail.com |
| १५. | कार्यासन "एन"- | sghpune@gmail.com |

# ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१.

संचालनालयाच्या अधिनस्त असलेली वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयांची नावे व खाटांची संख्याः-

| अ.क्र. | रुग्णालये व आरोग्य विभाग | खाटांची संख्या |
|---|---|---|
| १. | ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे | १२८६ |

# माहिती अधिकार अधिनियम २००५

## कलम ४( १) ख (सोळा )

ससुन सर्वोपचार रुग्णालय,पुणे.येथील माहितीचा अधिकार या सार्वजनिक प्राधिकरणाच्या अखत्यारितील माहिती संदर्भात जनमाहिती अधिकारी,

सहाय्यक जनमाहिती अधिकारी,प्रथम अपिलीय अधिकारी, यांची तपशीलवार माहिती अधिनियम २००५ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी.

### नमुना " क "
### जनमाहिती अधिकारी

| अ. क्र | जनमाहिती अधिका-याचे नांव | अधिकार पद | जनमाहिती अधिका-याची कार्यकक्ष | संपुर्ण पत्ता/दूरध्वनी क्रमांक | ई-मेल आयडी (या कायद्यापुरता) | प्रथम अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.गोरोबा आवटे | प्रशासकीय अधिकारी | ससुन सर्वोपचार रुग्णालय,पुणे | ०२०-२६१६०९६४ | email sghpune@gmail.com | श्री.गणेश बडदरे |

### नमुना " ख "
### सहाय्यक जनमाहिती अधिकारी

| अ. क्र | सहाय्यक जनमाहिती अधिका-याचे नांव | अधिकार पद | सहाय्यक जनमाहिती अधिका-याची कार्यकक्ष | जनमाहिती अधिका-याची कार्यकक्ष |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.अनिल माने | कार्यालयीन अधिक्षक, | प्रशासकीय कार्यालय, ससुन सर्वोपचार रुग्णालय,पुणे. | प्रशासकीय कार्यालय, ससुन सर्वोपचार रुग्णालय,पुणे. |

### नमुना " ग "
### प्रथम अपीलीय अधिकारी

| अ. क्र | प्रथम अपीलीय प्राधिका-याचे नांव | अधिकार पद | प्रथम अपीलीय प्राधि-याची कार्यकक्ष | अहवाल देणारे जनमाहिती अधिकारी | ई-मेल आयडी (या कायद्यापुरता) |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.गणेश बडदरे | मुख्य प्रशासकीय अधिकारी, | ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे.व बै. जी.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,पुणे | श्री.गोरोबा आवटे | email deanbjmcpune@Fmail.com |

## ससुन सर्वोपचार रुग्णालयाचे विस्तृत स्वरुप :-

| | | |
|---|---|---|
| १ | कार्यासन " अे " | १) सर्व वर्ग १ व वर्ग २ अधिकारी आस्थापना<br>२) सर्व वर्ग १ व वर्ग २ कर्मचा-यांची सेवापुस्तके<br>३) सर्व अधिका-यांची ऑनलाईन कामे |
| २. | कार्यासन " बी " | १) सर्व "क" कर्मचारी आस्थापना<br>२) सर्व "क" कर्मचा-यांची सेवापुस्तके<br>३) कर्मचा-यांची ऑनलाईन कामे |
| ३. | कार्यासन " सी " | १) सर्व "ड" कर्मचारी आस्थापना<br>२) सर्व "ड" कर्मचा-यांची सेवापुस्तके<br>३) कर्मचा-यांची ऑनलाईन कामे |
| ४. | कार्यासन " डी" | १) वैद्यकीयबिले तयार करणे<br>२) प्रवासभत्ता बिले तयार करणे<br>३) स्वग्राम तसेच महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत बिले तयार करणे |
| ५. | कार्यासन " इ " | १) माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सर्व कामे व लेखा परिक्षण बाबत सर्व कामे |
| ६. | कार्यासन " एफ " | १)चारमाही, आठमाही व वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे<br>२) तिमाही खर्चमेळ तयार करणे<br>३) मासिक अहवाल सादर करणे<br>४) पुरवणी अनुदानाचे प्रस्ताव सादर करणे |
| ७. | कार्यासन "जी " | १) पुरवठादाराचे सीएमपी रजिस्ट्रेशन करणे<br>२) देयके तयार करुन कोषागारातून पारित करुन घेणे<br>३) देयकांच्या आक्षेपाची पूर्तता करणे |
| ८. | कार्यासन " एच " | १) निवृत्तीवेतन तयार करणे<br>२) भविष्य निर्वाह निधी |
| ९. | कार्यासन " आय " | १) वेतन करणे, फरक काढणे, वेतन नोंद करणे<br>२) संचालक यांनी मागितलेली माहिती देणे<br>३) माहिती अंतर्गत माहिती देणे, रजा रोखीकरण |
| १० | कार्यासन " जे" | १) नविन बांधकाम प्रस्तवित करणे<br>२) बांधकाम दुरुस्ती प्रस्तावीत करणे<br>३) शासकीय निवासस्थानाचे वाटप करणे<br>४) रुग्णालयातील विभागाध्ये स्टेशनरी वाटप करणे. |
| ११. | कार्यासन " के " | १) पुरवठादार व कर्मचारी यांची पारित झालेली सर्व प्रकारीच देयके अदा करणे.<br>२) स्वीयप्रपंजी व इतर रोखविषयी व आर्थिक व्यवहार पाहाणे. |
| १२ | कार्यासन " एल " | १) विविधन्यायालयात व न्यायाधीकरणात या संस्थेविरुध्द चालु असलेली याचिका/तक्रारी याबाबतसर्व कामे पहाणे. |
| १३ | कार्यासन " एम " | १) कार्यालयात येणारे व कार्यालयातुन बाहेर जाणारे पत्राचा व्यवस्थीत निपटारा करणे |
| १४ | कार्यासन " एन " | १) सर्व अधिसेविका कर्मचारी आस्थापना<br>२) सर्व अधिसेविका कर्मचा-यांची सेवापुस्तके<br>३) अधिसेविका कर्मचारी यांची ऑनलाईन कामे |

**उपलब्ध सेवा :-**

| | | |
|---|---|---|
| **आपत्कालीन वैद्यकीय सुविधा** | - | २४ तास. |
| **बाहयरुग्ण विभाग** | - | सकाळी ०८.०० ते दुपारी ०१.०० |
| **कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक** | - | ०२०-२६१२८०००. |
| **कार्यालयीन वेळ** | - | सकाळी १०.०० ते सायं.०५.४५ वा. |
| **संकेतस्थळ** | - | www.bjmc.org |
| **ई-मेल आयडी** | - | sghpune@gmail.com |

**साप्ताहीक व इतर सुट्टया :-** महिन्यातला दुसरा शनिवार व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि शासकीय सुट्टया.

**क) कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त माहितीची उपलब्धता-**

रुग्णालयाकडून पुरविण्यांत येणाऱ्या सेवांबाबत संबंधित रुग्णालयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून माहिती मिळू शकेल.

**ब) तक्रार निवारण पध्दती :-**

- रुग्णालयात तक्रार नोंदविण्याकरिता तक्रार नोंदवही उपलब्ध आहे.
- सर्व तक्रारींची पोच ७ दिवसांचे आत दिली जाईल.
- रुग्णालयीन स्तरावर रुग्णालयीन कामकाजावर नियंत्रण व रुग्णालयांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी अभ्यागत मंडळ आहे.

- ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये येणा-या रुग्णांच्या नोंदणीसाठी एचएमआयएस प्रकल्पार्तंगत कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पांतर्गत आलेल्या प्रत्येक रुग्णास एक नोंदणी क्रमांक युनिक आयडी म्हणून प्रदान केला जातो. हा युनिक आयडी प्रदान करतांना रुग्णांचे नाव, वय, पत्ता, उत्पन्न, इत्यादी माहितीची नोंदणी केली जाते. नंतर रुग्ण केंव्हाही रुग्णालयात उपचारार्थ आल्यास त्याचा युनिक आयडी नोंदणी कक्षातील संगणकात टाकल्यास उपरोक्त माहिती उपलब्ध होते. या युनिक आयडी क्रमांकाने रुग्णालयात भविष्यात उपचार घेणे शक्य होणार आहे. तसेच हा संपूर्ण डाटा कायम स्वरुपी संकलीत होणार असल्याने हा डाटा कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयातून बघता येणे व उपचार प्रस्तावित करणे शक्य होणार आहे. तसेच यामुळे नोंदणीच्या वेळेत फार मोठया प्रमाणावर बचत झाली आहे. पूर्वी रुग्ण नोंदणीसाठी रुग्णास ५० ते ५५ मिनिटे रांगेत उभे रहावे लागत होते. एचएमआयएस प्रकल्प सुरु झाल्यापासून हा वेळ ८ ते १० मिनिटांवर आल्याने, रुग्णनोंदणी संख्येत देखील प्रचंड वाढ झालेली आहे. तसेच औषधी वितरणामध्येही सुधारणा झालेली असून डॉक्टरांनी सुचविलेली औषधे ऑनलाईन पध्दतीने वितरित होत असल्याने, ही माहिती कायमस्वरुपी संकलीत होत असल्याने, औषध वितरणामध्ये पारदर्शकता आलेली आहे. या प्रणालीच्या वापरामुळे डॉक्टरांचे हस्ताक्षर न समजल्याने होणा-या चुका नाहीशा झाल्या आहेत. तपासण्या अहवाल हरवल्यास सदरहू चाचण्या पुन्हा पुन्हा करण्याची गरज भासत नाही, कारण सदरहू अहवाल प्रणालीमध्ये संकलीत झालेला असतो. तो केव्हाही आणि कुठुनही काढता येतो.

रुग्ण तपासणी करणा-या डॉक्टरांना प्रकल्प सुरु होण्यापुर्वी रुग्णांच्या प्रयोगशाळा चाचण्या, क्ष-किरण, सोनोग्राफी, सी टी स्कॅन, एमआरआय अशा विविध चाचण्याचे अहवाल हस्त बटवडयाने वितरित करावे लागत होते. त्यामध्ये वेळ लागत होता. प्रकल्प सुरु झाल्यापासून सदरहू अहवाल परस्पर रुग्ण तपासणा-या डॉक्टरांना त्याच्या समोरील संगणकावर तात्काळ उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे डॉक्टरांना रुग्णावर उपचार व औषधोपचार करतांना रुग्णांबाबतची संपुर्ण माहिती एकाच ठिकाणी एकाच वेळेस उपलब्ध होत असल्याने उपचार करण्यास सोईचे झाले आहे. कोणत्या आजाराचे किती रुग्ण कोणत्या कालावधीत उपचारार्थ रुग्णालयात आले होते, याची सविस्तर माहिती तातडीने उपलब्ध करुन देणे शक्य झाले आहे. शासनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमार्तंगत संसर्गजन्य रुग्णांची माहिती तातडीने प्रशासनास उपलब्ध करुन देता येते. पूर्वी रुग्ण रुग्णालयात उपचारार्थ आल्यानंतर केसपेपर काढणे, डॉक्टरांनी सुचविलेल्या तपासण्या करणे व त्या तपासण्यांचे रिपोर्ट (अहवाल) गोळा करुन परत डॉक्टरांकडे औषधोपचारासाठी जाणे हि बाब फार कटकटीची होती. त्यामुळे त्यासाठी खुप वेळ लागत होता. परंतु प्रकल्प सुरु झाल्यापासून मात्र उपरोक्त प्रणालीमध्ये सुधारणा होऊन रुग्णांची सर्व माहिती ऑनलाईन पध्दतीने डॉक्टरांच्या संगणकावर चाचण्यांच्या अहवालसह उपलब्ध होत असल्याने, रुग्णालयीन सेवेच्या दर्जात वाढ झाली आहे.

**अपंगत्व प्रमाणपत्र वितरण :**

- रुग्णालयामध्ये आठवडयाच्या प्रत्येक बुधवारी व गुरुवारी (शासकीय सुट्टी वगळून) ऑनलाईन अपंग प्रमाणपत्र वाटप करण्यात येते. यामध्ये एचएमआयएस प्रणालीने फार मोठी महत्वाची भूमीका बजावली असून, एन के एन व एचएमआयएस प्रकल्पामुळे ते सहज शक्य होत आहे.

**परिचर्या (नर्सिंग) :**

- **अधिसेविका** : प्रशासकीय कामकाज पाहणे, संस्थेमध्ये शिस्त राखणे, आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण करणे. परिचर्या व्यवसायाचा दर्जा उंचावण्याकरिता प्रयत्न करणे. तसेच रुग्णालयातील सर्व सहाय्यक अधिसेविका, विभागीय परिसेविका, परिसेविका, आरोग्य परिसेविका, बालरोग परिचारिका, मनोरुग्ण परिचारिका, अधिपरिचारिका यांच्यावर नियंत्रण ठेवून रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णास जास्तीत जास्त आपल्या सेवेचा लाभ देणे याबाबत सूचना केल्या जातात.
- **शिक्षण** : भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या मानकांनुसार संस्थेत कार्यान्वित असणारे अभ्यासक्रम राबविणे, शिस्त व कर्तव्यपरायणता विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे. प्रशासकीय कामकाज, आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनास सहकार्य, संस्था पातळीवर सी.एन.ई.राबविणे.

**मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत समित्या :**

- **प्राधिकार समिती :**

मानवी अवयवाचे प्रत्यारोपण अधिनियम १९९४ नुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय २९ मार्च १९९५ अन्वये प्राधिकार समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत नातलग नसलेली व्यक्ती अवयव दान करत असल्यास त्यास परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येतो.

- **रुग्णालयातील कारभारासंदर्भात सल्लागार समिती :**
  वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयाकरिता अभ्यागत मंडळाची स्थापन करण्यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्रमांक : अभ्यांमं-५०१५/प्र.क्र. २५७/वैसेवा-३ दि.१७ जून, २०१६ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिपत्याखाली संलग्नित रुग्णालयात अभ्यागत मंडळाची रचना करण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे नमूद केली आहेत.

- **राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना :-**
  सन १९९९ पासुन राज्यात जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित होती. तथापि, या योजनेचा विस्तार करावा अशी जनता तसेच लोकप्रतिनिधींची मागणी होती. या सर्व बाबींचा विचार करुन महाराष्ट्र शासनाने राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक ३१ मे, २०११ (पहिला टप्पा आठ जिल्हयांकरीता) सुरु करण्यात आली व तद्नंतर दिनांक २१ नोव्हेंबर २०१३ पासुन संपुर्ण राज्यभरात सुरु आहे. महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटंबांसाठी विमा कंपनीच्या सहभागाने ९७२ मेडीकल प्रोसिजर्सचा समावेश करुन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने शासन निर्णय क्र. रागायो-२०१०/प्र.क्र. २४०/आरोग्य-६, दिनांक ३१ मे, २०११ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच १२१ पाठपुरावा सेवा यांचा योजनेत समावेश केलेला आहे. सदर योजनेची प्रमुख उद्दिष्टे पात्र लाभार्थींना कोणत्याही प्रकारचा खर्च न करता वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करुन देणे व पात्र लाभार्थींना तातडीच्या प्रसंगी गुणवत्तापुर्ण सेवा मिळणे हा आहे. या योजनेत नाक, कान, घसा शस्त्रक्रिया, स्त्रीरोगशास्त्र व प्रसुतीशास्त्र शस्त्रक्रिया यासारख्या सर्वसामान्य शस्त्रक्रियापासुन ते मेंदूच्या शस्त्रक्रिया, कर्करोगावर औषधोपचार, कर्करोगावर किरणोपचार, प्लास्टिक सर्जरी, मुत्रपिंडाचे आजार, आर्दीसारख्या ३० पेक्षा जास्त उपचारपध्दती प्रामुख्याने समाविष्ट केलेल्या आहेत. रा.गा.जी.आ.योजनेअंतर्गत क्लेम्सच्या माध्यमातून जमा होणा-या अनुदानाकरीता शासनाचे पत्र क्रमांक संकीर्ण२०१२/प्र.क्र. ११७/प्रशा-२, दिनांक २५/०७/२०१२ अन्वये स्वतंत्र बॅक खाते उघडण्यास अनुमती प्रदान केलेली आहे. त्यानुसार सर्व मा.अधिष्ठातांनी रा.गा.जी.आ.योजनेकरीता प्राप्त होणा-या अनुदानासाठी स्वतंत्र बॅक खाते उघडलेले असुन, सदरहू खात्यातून होणा-या खर्चाची कार्यवाही संस्थेकडून करण्यात येत आहे.

- शासन निर्णय क्र.एमआयएस-२००१/१२५३/सीआर-१९८/प्रशा-२ दि.०२/०८/२००१ अन्वये शासकीय कर्मचारी व त्यांचेवर अवलंबित असलेले कुटुंबिय, मानसिक वैद्यकीय अधिकारी व शासकीय रुग्णालये व दवाखान्यातील परिचर्या कर्मचारी वर्ग, वैद्यकीय व निमवैद्यकीय तसेच व्यवसायोपचार व भौतिकोपचार विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, न्यायाधिशांच्या आदेशान्वये स्थानबध्द व्यक्ती, स्वातंत्र्य संग्राम सैनिक व त्यांचे कुटुंबिय, न्यायवैद्यकीय प्रकरणातील औषधोपचारांसाठी पाठविण्यात आलेल्या व्यक्ती व न्याय चौकशी अधिन कैदी, पोलीसांतर्फे येणाऱ्या मेडिको लिगल केसेस, सुधार गृहातील रुग्ण, कुष्ठरोग मंडळाकडून येणारे रुग्ण, महिला सुधारगृहा तर्फे येणारे रुग्ण, नागरी विभागातील बेवारशी मुले, आश्रमशाळेतील मुले, सभापती, मंत्री, आमदार, खासदार, न्यायाधिश आणि माजी आमदार यांना सदर रुग्ण नोंदणी शुल्कामध्ये सुट देऊन उर्वरित रुग्णांकडून नोंदणी शुल्क आकारण्यात येते.

● **पाकशाळा विभाग :**

रुग्णांना देण्यात येत असलेल्या भोजन व्यवस्थेबाबत-
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे हे पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठे शासकीय रुग्णालय असून या रुग्णालयात पुणे शहर, जिल्हा व शेजारील रायगड, अहमदनगर, सातारा, सोलापूर या जिल्हयातील दररोज अंदाजे १२०० आंतररुग्ण, विविध आजाराच्या औषधोपचाराच्या उपचारासाठी म्हणून दाखल होत असतात. शासनाच्या मानकानुसार वेगवेगळया रुग्णांना वेगवेगळा आहार दिला जातो. या रुग्णालयाच्या पाकशाळा विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत आंतररुग्णांसाठी सकाळी अल्पोपहार, दुपारी व रात्री पौष्टिक जेवण तयार करुन दिले जाते.

| | | |
|---|---|---|
| **सकाळी** | - | नाश्त्यामध्ये - दुध, चहा पोहे किंवा उपीट<br>मोसंबी - एल.डी.एस., डी.ए.डी. व सी.एस.डी (मुलांसाठी) |
| **दुपारी** | - | जेवणामध्ये - पोळी, भात, डाळीचे वरण व भाजी.<br>खिचडी - आयुर्वेद कक्ष व लहान मुलांसाठी.<br>भात व डाळीचे पेज - एल.डी.एस (आर.टी) रुग्णांसाठी |
| **संध्याकाळी** | - | जेवणामध्ये चपाती, भात, डाळीचे वरण व भाजी.<br>भात व डाळीचे पेज - एल.डी.एस. (आर. टी) रुग्णासाठी. |

**जय गणेश रुग्ण सेवा अभियान"** :- श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टकडून पाकशाळेचे नूतनीकरण करण्यात आलेले असून दैनंदिन स्वयंपाकासाठी आवश्यक त्या सर्व सोई व यंत्रसामुग्री (आटा मळणीयंत्र, चपाती मशीन व मसाला ग्राइंडर, डीश वॉशर, कुकर्स व भाजी कापणीचे यंत्र) त्यांनी उपलब्ध करुन दिलेले आहे. रुग्णांच्या आहारासाठी लागणारा शिधा / अन्नधान्याचा पुरवठा (की ज्यामध्ये नाष्टा व दोन वेळचे जेवण) दि.१९.०९.२०१३ पासून ट्रस्ट कडून मोफत देण्यात येत आहे.

तसेच बालरुग्ण (कक्ष २९/३०) कुपोषित बालकांसाठी विशिष्ट आहाराचे साहित्य उदा.शेंगदाणे, सोयाबीन रिफाइंड तेल, साखर, अमुल दूध पावडर व मुरमुरे त्यांच्या मागणीनुसार ट्रस्टकडून पुरवठा करण्यात येत आहे. Human Milk Bank साठी दररोज गुळ व शेंगदाण्याची चिक्की पाकशाळेमध्ये बनवून संबंधित वॉर्डला वितरण करण्यात येत आहे.

**अंडी पुरवठा** - National Eggs Corporation Committee, Market Yard, Pune **यांचे कडून देणगी स्वरुपात ३०० नग अंडयांचा पुरवठा करण्यात येत आहे. सदर अंडी रुग्णांना वाटप करण्यात येतात.**

| अ. क्र | सेवेचे नाव | लागणारी कागदपत्रे | लागणारा कालावधी | जबाबदार अधिकारी | पर्यवेक्षक |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन्माची नोंद | अर्ज | १० दिवस | | |
| २ | मृत्युची नोंद | अर्ज | १० दिवस | | |
| ३ | वैद्यकीय प्रमाणपत्र | विहीत नमुन्यातील अर्ज | त्याच दिवशी | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ४. | इजा प्रमाणपत्र | पोलिस ठाण्याचे पत्र | ५ दिवस | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ५. | वयाचे प्रमाणपत्र | विहीत नमुन्यातील अर्ज,आधार कार्ड,रेशन कार्ड,मतदान ओळखपत्र | मंगळवार बुधवार | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ६. | रुग्णालय सोडल्याचा दाखला | — | त्याच दिवशी | वार्ड इंचार्ज | अधिष्ठाता |
| ७. | वैद्यकीय प्रतीपुर्ती मंजुरी | विहीत नमुन्यातील अर्ज | ४५ दिवस | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ८. | अपंगत्वाचे प्रमाणपत्र | आधारकार्ड,मतदान ओळखपत्र,वाहन परवाना,पासपोर्ट | बुधवार गुरुवार | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ९ | वैद्यकीय तपासणी | संबंधीत कार्यालयाचे पत्र | त्याच दिवशी | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| १० | माहिती अधिकार | दहा रुपयाचा कोर्ट फी स्टॅप चिटकवलेला अर्ज | माहिती अधिकार अधिनियमानुसार | जनमाहिती अधिकारी | अधिष्ठाता |

अधिष्ठाता
ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे.

O/C
21-11